नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/11/2022 (सोमवार) सायंकाळ

# दुकानांचे शटर तोडून चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला केले जेरबंद

## (स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कार्यवाही)

नागपूर ग्रामीण हद्दीत दुकानांचे शटर तोडून चोरीच्या घटना करणाऱ्या अज्ञात आरोपींचा शोध घेण्याकरीता नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात विशेष पथक तयार केले. पोलीस स्टेशन अरोली हद्दीत बस स्टॉप रोडजवळ, श्री सतिश बावनकुळे यांचे हार्डवेयर दुकान व श्री. विजय हटवार यांचे बिल्डींग मटेरियल सप्लायर्स या दुकानाचे शटर वाकवून चोरीची घटना दिनांक २३/११/२०२२ रोजी घडली. या मध्ये चोरट्यांनी १०,३९,०००/– रूपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. या संदर्भात पोलीस स्टेशन अरोली येथे गुन्हे रजिस्टर क्र. १८८/२०२२ कलम ४५७, ३८० भादवि प्रमाणे नोंद आहे. या संबंधात विशेष पथकाने शटर तोडून चोऱ्या करणाऱ्या आरोपीतांचा छडा लावण्याकरीता तांत्रीक साधनांचे आधारे समांतर तपास करण्यास सुरवात केली. गुन्हेगारांनी गुन्हा करतेवेळी चार चाकी वाहनाचा वापर केल्याचे निष्पन्न झाल्याने त्या आधारे तपास करण्यात आला. तपासादरम्यान नागपूर ग्रामीण पोलीसांना यश आले व त्यांना दिनांक २५/११/२०२२ रोजी संशयीत चारचाकी वाहन क्रमांक MH 02 JP 4010 हे गुन्ह्यात वापरल्याची खात्रीशिर माहिती मिळून आली. याच धाग्याचे आधारे स्थागुशाचे विशेष पथकाने हैद्राबाद येथे जावून संशयीत आरोपींचा मार्ग काढला असता त्यांना गुन्हयात वापरलेले वाहन हुन्डाई कार क्रमांक MH 02 JP 4010 हे हैद्राबाद–बंगलोर महामार्गावर कर्नुल जवळ आरोपी १) धनंजय उर्फ चिन्ना रामकृष्ण अप्पा रेड्डी, वय ४६ वर्ष, रा. मगाल क्वॉर्टर विकलांग क्वॉर्टर, हिंदपूर रोड, कादरी जि. पुट्टूपर्थी, आंध्रप्रदेश आणि २) फरहान अहमद अब्दुल गफार वय २७ वर्ष, रा. इंदीरा नगर, कापुसतळणी तह. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती ह.मु. मेहर शेख यांचे घरी किरायाने, इंजन बावली, फलकनुमा हैद्राबाद यांचेसह मिळून आले. दोन्ही आरोपींना ताब्यात घेवुन गुन्हयासंबधात त्यांची सखोल चौकशी केली असता दोन्ही आरोपींनी त्यांचा तिसरा साथीदार शेख अन्सार शेख कय्युम रा. नुरनगर, अमरावती याचेसोबत मिळून त्यांचे ताब्यातील वाहनाचा वापर करुन दि. २३/११/२०२२ रोजी रात्री दरम्यान अरोली या गावात रोडवरील श्री सतिष बावनकुळे यांचे हार्डवेयर दुकान व श्री विजय हटवार यांचे बिल्डींग मटेरियल सप्लायर्स या दुकानाचे शटर वाकवून चोरी केल्याचे सांगीतले. आरोपीच्या ताब्यातुन रोख रक्कम १,८०,०००/– रुपये, हुन्डाई जुनी कार क्रमांक MH 02 JP 4010 किं. ५,००,०००/– आणि दोन मोबाईल फोन किंमती १५,५००/– रु. असा एकुण ६,९५,५००/– रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.

वरील आरोपींनी दि. २२/११/२०२२ रोजी अकोला जिल्हयातील निंबा फाटा येथे हार्डवेअरचे दुकानात शटर तोडून चोरी केल्याची माहिती दिली आहे. त्यावरुन माहिती घेतली असता पोलीस स्टेशन उरळ जि. अकोला येथे गुन्हे रजि.नं. २३८/२०२२ कलम ४६१, ३८० भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद आहे. तसेच वरील आरोपींवर यापुर्वी कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलंगाना राज्यात विवीध ठिकाणी दुकानांचे शटर तोडून चोरी केल्याची माहिती दिलेली आहे.

सदरची कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरीक्षक, राजीव कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, आशिष ठाकुर, पोलीस हवालदार गजेन्द्र चौधरी, रोशन काळे, राजेन्द्र रेवतकर, पोलीस नायक अमृत किनगे, रोहन डाखोरे, विपीन गायधने चालक पोलीस हवालदार अमोल कुथे, चालक पोशि आशुतोष लांजेवार, चापोशि. सुमित बागडे तसेच सायबर सेलचे नायक सतिष राठोड यांनी पार पाडली.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर